# भारतीय कृषी क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग



जिज्ञासा मरघडे          पराग पाखमोडे          संगीता भट्टाचार्या
भा. कृ. अनु. प. – केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था, अमरावती रोड, नागपूर

२०११ च्या जनगणनेनुसार, अंदाजे ३३.७ % ग्रामीण पुरुष रोजगार आणि चांगल्या आर्थिक संधींच्या शोधात स्थलांतर करतात. ग्रामीण पुरुषांच्या वाढत्या स्थलांतरामुळे कृषी क्षेत्राचे स्त्रीकरण होत आहे तसेच कृषी आणि संबंधित कामांमध्ये महिलांचा सहभाग अधिक लक्षणीय होत आहे. या बदलत्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी भारताच्या धोरणात्मक उपक्रमाच्या केंद्रस्थानी महिलांना ठेवणे आवश्यक आहे.

भारतीय कृषी क्षेत्राचे स्त्रीकरण होण्याचे मुख्य कारण म्हणजे स्त्रिया कमी पगाराचे अनियमित काम स्वीकारण्यास इच्छुक असतात. त्यांना कामावर घेणे सोपे असते तसेच महिला विनम्र आणि मेहनती असल्याचे मानले जाते आणि शेतीतील काही कामांना महिलांचे काम म्हणून दर्शविले जाते. त्याचप्रमाणे पुरुषांना सामान्यतः कमावणारे म्हणून समजले जाते कारण त्यांना शिक्षणाच्या अधिक संधी मिळतात आणि त्यांना शारीरिक श्रमासाठी प्राधान्य दिले जाते. परिणामस्वरुप भारतीय ग्रामीण पट्ट्यात, चांगल्या नोकऱ्यांच्या शोधात पुरुषांचे स्थलांतर आणि त्यांचे ग्रामीण भागातून शहरी भागात जाण्याची अधिक शक्यता असते. तर स्त्रिया प्रामुख्याने घरगुती कामे आणि शेतीसाठी जबाबदार असतात. गरिबीमुळे स्त्रिया अनेकदा शेतमजूर किंवा घरगुती मजूर म्हणून काम करतात जेणेकरून कुटुंबाच्या उत्पन्नाला पूरक ठरतात.

नैसर्गिक शेतीमध्ये नैसर्गिक किंवा पर्यावरणीय प्रक्रियांवर आधारित पद्धतींचा वापर नैसर्गिक संसाधानाद्वारे केला जातो. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवताना तसेच पर्यावरणीय फायदे मिळवून देताना आणि पौष्टिक अन्न सुरक्षा राखताना खरेदी केलेल्या संसाधनांवर त्यांचा अवलंब कमी करण्यासाठी भारतीय कृषी क्षेत्राचे स्त्रीकरण हे एक साधन आहे. दुसरे मुख्य कारण म्हणजे नैसर्गिक शेती उपक्रमांमध्ये महिलांचा सहभाग त्यांना त्यांचे उत्पन्न आणि निर्णय प्रक्रियेत त्यांच्या सहभागाची मदत होईल. याचा कुटुंबाच्या आरोग्यावर आणि पौष्टिक स्थितीवरही सकारात्मक परिणाम होईल. अभ्यासकांनी सूचित केले आहे की प्राथमिक उत्पादक म्हणून कृषी संसाधनांवर महिलांचे नियंत्रण आणि त्यांच्या घरातील सामाजिक-आर्थिक वैशिष्ट्ये यांचा थेट संबंध आहे. भारतीय समाजात स्त्रिया मुख्यतः त्यांच्या कुटुंबासाठी स्वयंपाक करत असल्याने त्यांना त्यांच्या मुलांचे पालनपोषण करण्यासाठी नैसर्गिक उत्पादनांचे महत्त्व समजते. परिणामी पुरुषांच्या तुलनेत महिलांची शेती स्वीकारण्याची शक्यता जास्त आहे.

पारंपारिक बियाण्यांचे संवर्धन करणे, नैसर्गिक खत तयार करणे आणि दैनंदिन घरगुती गरजा पूर्ण करण्यासाठी विविध नैसर्गिक संसाधनांचा वापर करणे यासारख्या पर्यावरणीय पद्धतींद्वारे जैवविविधतेचे व्यवस्थापन आणि शाश्वत शेतीमध्ये महिलांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. नैसर्गिक शेतीमध्ये स्त्रियांचा सहभाग देशाच्या शाश्वत विकासाच्या ध्येयाला समर्थन देईल.

आंध्र प्रदेश समुदाय-व्यवस्थापित नैसर्गिक शेतीने महिला स्वयं-मदत गटांच्या (SHGs) विद्यमान संस्थात्मक व्यासपीठाचा वापर करून सामाजिक एकत्रीकरण, सामूहिक कृती, सामुदायिक शिक्षण आणि सामुदायिक विपणनामध्ये महिलांना गुंतवून ठेवले आहे. त्यामुळे नैसर्गिक शेतीच्या कार्यक्रमाचे प्रमाण वाढले आणि ते टिकवून ठेवण्यासाठी सखोल प्रयत्न करत आहे. या चळवळीने महिलांना त्यांचे घरगुती संगोपण आणि आर्थिक स्थिती सुधारण्यात मदत केली आहे.

भारत सरकार महिला सक्षमीकरण आणि शेतीशी संबंधित अनेक उपक्रम राबवत आहे ज्यामध्ये राष्ट्रीय महिला किसान दिवस, राष्ट्रीय शाश्वत शेती मिशन (NMSA), परंपरागत कृषी विकास योजना, महिला किसान सशक्तिकरण योजना (MKSP) यांचा समावेश होतो.

भारतीय कृषी क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांना सामाजिक व आर्थिक सुरक्षा मिळणे गरजेचे आहे तसेच महिलांना शेतीची मालकी मिळायला हवी जेणेकरून त्यांना सरकारी योजनेचे फायदे मिळू शकतील. २०१५-१६ कृषी जनगणनेनुसार शेतीत कार्यरत असलेल्या ७३.२% ग्रामीण महिलांपैकी केवळ १२.८% महिलांजवळ स्वत:च्या मालकीची जमीन आहे.

या क्षेत्रातील महिलांची उपस्थिती आणि त्यांचे योगदान ओळखण्यासाठी कृषी धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये सर्वसमावेशक दृष्टिकोण असणे आवश्यक आहे. याशिवाय, महिलांना उद्देशून उत्तम विस्तार सेवा आणि प्रशिक्षण कार्यक्रम करणे गरजेचे आहे. महिलांपर्यंत विविध कायद्यांची माहिती तसेच कार्यक्रम आणि योजनांचे सूत्रीकरण व संसाधनांचे समान वाटप व्हायला पाहिजे. जेणेकरून विकासाचे फायदे पुरुषांइतकेच महिलांपर्यंत सुद्धा पोहोचतील. शेतात काम करणाऱ्या महिलांना त्यांच्या गावाच्या भूगोलाबद्दल अधिक माहिती असते आणि त्यामुळे नियोजनात समता आणि सर्वसमावेशकताही येऊ शकते. भारताच्या कृषी क्षेत्रातील महिलांच्या भूमिकेला मुख्य टप्प्यात आणण्यासाठी नियोजनाच्या टप्प्यावर स्थानिक महिलांचा समावेश केला गेला पाहिजे परिणामी भारतीय कृषी क्षेत्रात स्त्रियांच्या सहभागाला अधिक चालना मिळेल.

★ ★ ★

(संपर्क: +९१ ९४०३३५३७३०)